# <u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग</u>

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला मेट्रो ३ प्रकल्पाचा कामाचा आढावा

प्रस्तावित विधान भवन आणि चर्चगेट स्थानकांची केली पाहणी

मुंबई, दि.१० मे :- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फत सुरू असलेल्या मुंबई मेट्रो लाईन ३ या भूमिगत प्रकल्पाचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज उशिरा रात्री आढावा घेतला. यावेळी त्यांच्यासोबत संचालक प्रकल्प श्री एस के गुप्ता आणि इतर वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कफ परेड ते सीप्झ दरम्यान प्रस्तावित असलेल्या या मेट्रो मार्गाचे सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर आहे. मेट्रो 3 सारखा तांत्रिकदृष्ट्या कठीण प्रकल्प पूर्ण करण्याचे आव्हान कॉर्पोरेशनचे अधिकारी लीलया पेलत असल्याचे म्हणत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी एमएमआरसीएलच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

डिसेंबर २०२३ पर्यंत आरे ते बीकेसी दरम्यान (फेस १) मेट्रो मार्गिका ३ सुरू करण्याचे नियोजित असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजच्या आढावा दरम्यान महत्त्वाच्या सूचना केल्या. तसेच सुरू असलेल्या कामांबाबत समाधान व्यक्त केले.

विधान भवन स्थानकाचे ८८% काम तर चर्चगेट स्थानकाचे ८३% काम पूर्ण झाले आहे. मेट्रो 3 कार्यान्वित झाल्यावर ही दोन्ही स्थानके चाकर मान्यांसाठी वरदान ठरणार आहेत. *समाप्त*


For further information please contact: -

Niti Tamse/AM (PR)
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com

Vaidehi Khadse/Sr. AGM (PR)
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

## कुलाबा - वांद्रे - सिप्झ मुंबई मेट्रो ३ मार्ग

मुंबई मेट्रो मार्ग-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) हा मुंबईसाठी प्रस्तावित असलेला पहिला आणि एकमेव पूर्णपणे भूमिगत मेट्रो मार्ग आहे. शहरात वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी तसेच वाहतुकीच्या पर्यायी सुविधेसाठी मेट्रो-३ मार्गाची अंमलबजावणी होत आहे. वर्ष २०३१ मध्ये दररोज १७ लाख प्रवासी मेट्रो-३ मार्गावर प्रवास करतील. प्रत्येक मेट्रो गाडीत २५०० प्रवाशांना प्रवास करता येईल. प्रत्येक गाडी ही ३ ते ४ मिनिटांनी उपलब्ध असली तरीही सदर मेट्रो गाड्या दर २ मिनिटांच्या कालावधीत धावण्यास सक्षम आहेत.

**मेट्रो ३ प्रकल्पाबाबत माहिती :**

* कुलाबा-वांद्रे-सिप्झ हा ३३.५ कि.मी. लांबीचा भुयारी मार्ग आहे

* या मार्गावर २७ स्थानके असून त्यापैकी २६ भुयारी तर एक जमिनीवर आहे.

* या मार्गामुळे प्रमुख व्यवसाय आणि रोजगार केंद्रे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे, मनोरंजनाच्या सुविधा तसेच उपनगरीय रेल्वेशी न जोडलेल्या काळबादेवी, गिरगाव, वरळी, आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमानतळांसारख्या भागांना जोडणी मिळेल.

* २०२४ पर्यंत मेट्रो-३ च्या प्रत्येकी ८ डब्यांच्या ३१ गाड्या कार्यरत असतील.

* इतर मेट्रो मार्ग, मोनोरेल, उपनगरीय रेल्वे आणि एसटी बस सेवांशी एकत्रित जोडणी करत असून उपनगरीय रेल्वेतील १५% प्रवासी मेट्रो-३ कडे वळतील.

* वर्ष २०४१ पर्यंत मेट्रो-३ मुळे वाहनांच्या फेऱ्यांमध्ये प्रतिदिन ६.६५ लाखाने घट होईल.

* वर्ष २०४१ पर्यंत प्रतिदिन ३.५४ लाख लिटर इतका इंधनाचा वापर होईल.

* या मार्गामुळे दरवर्षी २.६१ लाख टन $CO_2$ उत्सर्जन कमी होईल. (स्रोत: UNFCC)

**पहिला टप्पा - आरे ते बीकेसी**

* एकूण स्थानके - या मार्गावर १० स्थानके असून त्यापैकी ९ भुयारी तर एक जमिनीवर आहे.

* अंतर - १२.४४ किमी

* दोन गाड्यांमधील कालावधी - ६.५ मिनिटे

* पहिल्या टप्प्यातील गाड्यांची संख्या - ९ गाड्या

* मेट्रो ३ मार्गाचे (पहिल्या टप्प्यातील) एकूण ८७.२% काम पूर्ण

* एकूण ९७.८% प्रकल्प बांधकाम पूर्ण

* एकूण ९३% स्थानक बांधकाम पूर्ण

* एकूण ६५.१% प्रणालीची कामे पूर्ण

* रेल्वे रुळाचे एकूण ८६.३% बांधकाम पूर्ण

* सेवेची चाचणी ऑक्टोबर २०२३ पर्यंत सुरू होणे अपेक्षित आहे

* मेट्रो रेल सुरक्षा आयुक्त (सीएमआरएस) द्वारे मेट्रोची सुरक्षा चाचणी डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे

* मेट्रो-३ चा पहिला टप्पा पूर्ण करण्याचे काम खूपच आव्हानात्मक आहे तरी, डिसेंबर २०२३ पर्यंत हा टप्पा सुरू करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.

**दुसरा टप्पा - बीकेसी ते कफ परेड**

* एकूण स्थानके - १७

* अंतर - २१.३५ कि.मी.

* दोन गाड्यांमधील कालावधी - ३.२ मिनिटे

* दुसऱ्या टप्प्यातील गाड्यांची संख्या - २२ गाड्या

* मेट्रो ३ मार्गाचे (दुसऱ्या टप्प्यातील) एकूण ७६.९% काम पूर्ण

* एकूण ९५.३% प्रकल्प बांधकाम पूर्ण

* एकूण ८८.३% स्थानक बांधकाम पूर्ण

* एकूण ४२.४% प्रणालीची कामे पूर्ण

* रेल्वे रुळाचे एकूण ४६.६% बांधकाम पूर्ण

* हा मार्ग जून २०२४ मध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे

**प्रकल्पाची सद्यस्थिती (८ मे २०२३ पर्यंत)**

* मेट्रो ३ मार्गाचे एकूण ८१.५% काम पूर्ण

* एकूण ९२.८% प्रकल्प बांधकाम पूर्ण

* एकूण ८९.८% स्थानक बांधकाम पूर्ण

* एकूण ५०.९% प्रणालीची कामे पूर्ण

* रेल्वे रुळाचे एकूण ६१.१% बांधकाम पूर्ण

* भुयारी मार्गाचे १००% काम पूर्ण

* ४२ पैकी एकूण ४२ ब्रेकथ्रू संपन्न

* डेपोचे एकूण ६३% बांधकाम पूर्ण

१) मुं.मे.रे.कॉ. ला झाडे तोडण्यासंदर्भात अंतिम परवानगी नुकतीच मिळाली असली तरी ऑक्टोबर २०२३ पर्यंत डेपो सुरू करून कार्यान्वयना संदर्भातील (Operational trials)सर्व चाचण्या सुरू करण्यासाठी मुं.मे.रे.कॉ. सज्ज आहे. मेट्रो-३ चा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू करण्यासाठी मुं.मे.रे.कॉ. कटीबद्ध आहे.

२) सद्यस्थितीत डेपो ३१ गाड्यांच्या देखभालीसाठी सज्ज असून २०५३ पर्यंत कारडेपोत ५५ गाड्यांची देखभाल करता येणे शक्य होणार आहे.

३) आरे डेपोमध्ये वेगवेगळ्या कंत्राटदारांच्या समन्वयाने मोठ्या प्रमाणावर काम केले जात असून डेपोमध्ये देखभाल आणि कार्यशाळा इमारत कामे, ओसीसी (ऑपरेशन कंट्रोल सेंटर), ओएचई (ओव्हरहेड इक्विपमेंट) सिस्टम, एमईपी (मेकॅनिकल इलेक्ट्रिकल प्लंबिंग) कामे, स्टॅबलिंग लाइन, ऑक्झिलरी सबस्टेशन, वॉश प्लांट, रेल्वे रूळ घालणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

**मेट्रो-३ च्या गाड्या**

आतापर्यंत मेट्रो-३ च्या तीन गाड्या मुंबईत दाखल झाल्या आहेत व अजून दोन गाड्या श्रीसीटी आंध्र प्रदेश येथील ऑस्तोम कारखान्यातून मुंबईकरता रवाना झाल्या असून दिनांक १७/१८ मेपर्यंत सदर गाड्या मुंबईत दाखल होणे अपेक्षित आहे. यानंतर उर्वरित ४ गाड्या प्रत्येक महिन्यात २ अशा मुंबईत दाखल होतील.